गट शेतीस प्रोत्साहन व सबलीकरणासाठी शेतकऱ्यांच्या गट शेतीस चालना देणे ही योजना राबविण्यास सुधारीत मान्यता....

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः कृविका-२०१८/प्र.क्र. ३२ (भाग-१)/३-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : ०५ सप्टेंबर, २०१८

वाचा -

१ कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक कृविका- २०१७/प्र.क्र. ३२/३अे, दि. २४/०७/२०१७
२ कृषि व पदुम विभाग, शासन पुरक पत्र, क्र. कृविका-२०१७/प्र.क्र. ३२/३ अे, दि. १/०९/२०१७
३ कृषि व पदुम विभाग, शासन पुरक पत्र, क्र. कृविका-२०१७/प्र.क्र. ३२/३ अे, दि.१७/१०/२०१७
४ कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र. कृविका-२०१७/ प्र.क्र. ३२/३-अे, दि. १३/०४/२०१८
५ दि. २५ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीचे कार्यवृत

प्रस्तावना :-

सन २०२२ पर्यन्त शेतक-यांचे पीक उत्पादन वाढविण्यासाठी निविष्ठा, प्रशिक्षण, सिंचन, यांत्रिकीकरण, काढणी पश्चात तंत्रज्ञान, कृषिमाल प्रक्रिया व पणन इत्यादी बाबी महत्वाच्या ठरतात. राज्यातील शेतकऱ्यांची जमीनधारणा कमी असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनात भरीव वाढ होण्यासाठी सामुहीक शेती, शेती करण्याची आधुनिक पध्दती व काटेकोर नियोजनाची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने शेतकरी गटांमार्फत गट शेतीस प्रोत्साहन देण्यात येणे आगत्याचे आहे.

संकल्पना:-

एका समुहातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शिवारातील संलग्न भौगोलिक क्षेत्रामध्ये सामुहीकरित्या नियोजनबध्द शेती करणे, शेती उत्पादनावर प्रक्रिया व मुल्यवर्धन करणे, एकत्रित विपणन करणे यासाठी सामुहीक स्वरुपाची व्यवस्था निर्माण करणे, शेती या व्यावसायिक जीवन पद्धतीद्वारे स्वतःची, गटाची, समुहाची उन्नती व विकास घडवुन आणण्याची प्रक्रिया म्हणजेच समुह/गटशेती होय.

२. समुह / गटशेतीची आवश्यकता-

२.१. जमिनीचे सातत्याने होत असलेले विभाजन /तुकडे -

लोकसंख्या वाढी बरोबरच शेतीची धारण क्षमता दिवसें दिवस कमी होत चाललेली आहे. कृषि गणनेच्या प्रकाशित केलेल्या सन २०१०-११ च्या अहवालानुसार महाराष्ट्रात सन १९७०-१९७१ या वर्षी असलेले ४.२८ हेक्टरची धारण क्षमता सातत्याने कमी होऊन सन २०१०-२०११ मध्येती १.४४ हेक्टर प्रति खातेदार इतकी कमी आहे. काही ठिकाणी तर ११ ते १५ गुंठे इतक्या कमी आकारावर शेती कसण्यासाठी सलग क्षेत्र शिल्लक राहिलेले आहे. अशा परिस्थितीत एवढ्या छोट्या क्षेत्रावर शेती करुन आर्थिक दृष्ट्या किफायतशीर उत्पादन घेणे अत्यंत जिकिरीचे ठरत आहे. या सर्व समस्यांवर सामुहीक शेती पध्दतीद्वारे व एकत्र केल्या जाणा-या क्षेत्रामुळे गटांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान देणे सोईचे ठरते.

२.२. उच्च तंत्रज्ञान व यांत्रिकीकरणाचा अवलंब करुन शेती व्यवसाय सुकर करणे- (Ease of Doing Farming)-

शेती मधल्या उत्पादनाची अनिश्चितता, तसेच वाढत्या नागरीकरणामुळे ग्रामीण भाग़ातुन शहराकडे होत असलेले स्थलांतर यामुळे शेती क्षेत्रा मध्ये कुशल तसेच अकुशल मनुष्यबळाची कमतरता जाणवत आहे. म्हणून त्याकरिता यांत्रिकीकरण व तांत्रिक मार्गदर्शनाची आवश्यकता आहे व ते सामुहीकरित्याच करणे सोयीचे होईल. जमिनीची शेतकऱ्याकडे असलेली वैयक्तिक धारणा कमी झाल्याने त्याला त्याच्या शेतावर उच्च तंत्रज्ञान तसेच यांत्रिकीकरणाचा अवलंब वैयक्तिकरित्या करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. सामुहीक शेती केल्याने व उत्पादन खर्चात काटकसर केल्याने या समस्येवर सहजरित्या तोडगा निघु शकतो.

२.३. विपणन पद्धतीचा अवलंब -

शेतकऱ्याचे उत्पादन हे व्यक्तिगत स्तरावर असल्याने त्याला त्याच्या उत्पादीत केलेल्या मालाचे विपणन योग्यरित्या करता येत नाही. परिणामी, त्याला कमी भावात त्याचा माल विकावा लागतो. त्यामुळे त्याच्या मालाला वाजवी भाव मिळत नाही. मात्र, सामुहीक शेती पद्धतीने उत्पादित केलेल्या मालाचे एकत्रितरित्या विपणन केल्याने वाहतुकीतील व काढणी पश्चात होणारे नुकसान टाळून उत्पादन खर्चातील बचत वाढवून दुरवरची बाजारपेठ काबीज करता येणे शक्य होणार आहे.

२.४. काढणी पश्चात प्रक्रिया करणे -

बऱ्याच वेळा निसर्गाकडून मिळालेली साथ, शेतकऱ्यांचे अथक प्रयत्न व कृषि क्षेत्रावर नियोजन करुन शेतकऱ्याचे उत्पादन अपेक्षेपेक्षा जास्त आल्यास बाजारभावात घसरण होऊन शेतकऱ्यास कमी भाव मिळतो. नाशवंत उत्पादन जसे की भाजीपाला व फळे यांचा अधिक साठा झाल्यास नुकसान होण्याची शक्यता निर्माण होते. अशा वेळी काढणी पश्चात प्रक्रियेचा अवलंब केल्यास शेतकऱ्यास योग्य भाव मिळु शकतो. तसेच प्रक्रिया उद्योगामुळे पाश्चात्त देशातील प्रयोगसिध्द तंत्रज्ञान आपल्या राज्यातील गटांमध्ये वापरता येईल व एकत्रित शेती विकसित करता येईल.

२.५. प्रक्रियाउद्योग व मुल्यवर्धन-

मोठे भांडवल व उत्पादना अभावी छोट्या शेतक-यांना उत्पादीत मालावर प्रक्रिया करणे व त्याचे मुल्यवर्धन करणे शक्य होत नाही. मात्र सामुहीक शेतीद्वारे प्राथमिक प्रक्रिया तसेच मालाचे मुल्यवर्धन शेतावरच करता येईल व गुंतवणुकदारांना शेतकरी गटाकडून एकाच ठिकाणी कच्चा माल मिळून प्रक्रिया उद्योगास चालना मिळेल.

२.६. शेती पूरक जोडधंदा -

सामुहीक शेतीमधील लागवडी योग्य जमीनीवर विविध पिकांचे उत्पादन घेण्याबरोबरच उपयुक्त जोडधंदा म्हणुन पशूपालन, रेशीमव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, दुग्धव्यवसाय, मधुमक्षीकापालन व रोपवाटीका तयार करणे इ. बाबी आवश्यक आहेत. मात्र, मनुष्यबळाची वानवा व जमिनीची कमी धारण क्षमता यामुळे शेतकरी पशुपालनापासुन दुर चाललेला आहे. परिणामी, सेंद्रिय खताची उपलब्धता कमी होत असल्याने जमिनीचा कस कमी होवून उत्पादकता कमी होणे, रासायनिक खतांचा वापर वाढणे परिणामी उत्पादन खर्च वाढणे या दुष्टचक्रामध्ये सद्यस्थितीत शेतकरी व शेती व्यवसाय अडकला आहे. या समस्येवर सामुहीक शेती पद्धती मध्ये पशुधनाचे एकत्रित व्यवस्थापन करुन उपाय मिळणे सहज शक्य आहे.

वरील सर्व घटकांच्या एकत्रित परिणामामुळे शेतक-यांचा उत्पादन खर्च कमी होवुन निव्वळ उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे सामुहीक शेतीचा अवलंब करणे ही काळाची गरज ठरत आहे.

याकरिता शेतकऱ्यांची गट/समूह शेती या प्राथमिक स्वरुपातील चालू असलेल्या राज्य योजनेत बद्दल करुन **"गट शेतीस प्रोत्साहन व सबलीकरणासाठी शेतकऱ्यांच्या गट शेतीस चालना"** ही योजना सन २०१७-१८ पासून दोन वर्षात पथदर्शी स्वरुपात राबविण्याचा शासन निर्णय दि. २४ जुलै, २०१७ अन्वये प्रस्तावित करण्यात आला होता. हा शासन निर्णय निर्गमित करताना प्रामुख्याने सलग क्षेत्र असलेल्या शेतकरी समुहाचा विचार करून अनुदान वितरणाचे टप्पे निश्चित करण्यात आले होते. प्रत्यक्षात सलग क्षेत्र असलेले शेतकरीच एकत्र येतात असे नाही. शेतकरी गट स्थापन होताना सलग क्षेत्र असलेले शेतकरी, एका परिसरात काम करणारे शेतकरी, सलग क्षेत्र नसलेले परंतु एका पुरक व्यवसायात एकत्र काम करणारे शेतकरी किंवा एका परिसरातील प्रक्रिया व विपणन यासाठी एकत्र आलेले शेतकरी, याप्रमाणे गट तयार होतात. त्याप्रमाणे अनुदान वितरणाकरीता पात्र घटक व द्यावयाचे अनुदान यासाठी सर्वसमावेशक शासन निर्णय काढणे विचाराधीन होते. यास्तव यासंदर्भातील सर्व शासन निर्णय अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे

<u>शासन निर्णय</u> :-

१. राज्यात सन २०१७-१८व २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये मध्ये मंजूर तरतुदीच्या अधिन राहून आयुक्त (कृषि) यांनी जिल्हानिहाय उद्दिष्ठ निश्चित करावे.

२. या योजनेअंतर्गत सहभागी होण्यासाठी नोंदणीकृत गट/समुहांना संधी उपलब्ध राहील. त्यासाठी सहभागी शेतकऱ्यांच्या गटाची नोंदणी आत्मा संस्था/महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अथवा कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतूदी अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी म्हणून आवश्यक राहील. तसेच या योजनेंअंतर्गत लाभ मिळण्याकरीता शेतकरी गटांच्या सर्व सदस्यांचे आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न असणे अनिवार्य राहील.

३. **गटासाठी देय अर्थसहाय्य -**

३.१. गट शेती योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या गटांना गट शेती योजनेतून देय अर्थसहाय्य हे प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के अथवा जास्तीत जास्त रूपये १.०० कोटी इतके राहील. गटांना हे अनुदान प्रचलित इतर योजनेमधून मिळणा-या अर्थसहाय्या व्यतिरीक्त राहील.

३.२ प्रकल्प आराखडयामध्ये सामाविष्ठ बाबींना कृषी व संलग्न विभागाच्या प्रचलित योजनामधून अभिसरणाद्वारे (Convergence) अर्थसहाय्य हे त्या-त्या योजनेतून प्राधान्याने अदा केले जाईल. योजनेच्या निकषाप्रमाणे शेतकरी गटाला संबंधित योजनेतून वैयक्तिक व सामुदाईक अनुदान देय राहील. तथापि प्रचलित योजनेंतर्गत देण्यात येणारे अनुदान ६०% पेक्षा कमी असल्यास गटाच्या सहमतीने ६०% अनुदान मर्यादेपर्यंत येणारे फरकाचे अनुदान (Top-Up subsidy) गट शेती योजनेमधुन देय राहील.

३.३ प्रचलित योजनेतून उद्दिष्ठ पूर्ती साध्य झाल्याने (म्हणून या गटाला सदर योजनेचा लाभ प्रचलित योजनेतून देणे शक्य होत नाही), उद्दिष्ठ प्राप्त न झाल्यास अथवा एखाद्या बाबीस अनुदान उपलब्ध नसल्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / संबंधित अधिका-याच्या शिफारशीनुसार गटास देय असणारे ६०% मर्यादेपर्यंत अनुदान गट शेती योजनेतून देय राहील.

३.४ गटशेती योजनेमध्ये सामाविष्ठ शेतकऱ्यांच्या प्रकल्प आराखडयामध्ये **किमान** ७५ टक्के अर्थसहाय्य हे सामूहिक तत्वावरील बाबींसाठी व **कमाल** २५ टक्के अर्थसहाय्य हे वैयक्तिक बाबींसाठी देय राहील.

४. **गटशेती योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठी समाविष्ट घटक -**

४.१ सामूहीक सिंचन सुविधा - गटातील शेतकऱ्यांचे शेती क्षेत्रास खात्रिशीर सिंचन सूविधा उपलब्ध होणेसाठी करावयाच्या उपाययोजनांमध्ये सामूहिक विहीर/ शेततळे, पाईपलाईन, ॲटोमायझेशन यूनिट, सुक्ष्म सिंचन इत्यादी सिंचन सूविधेअंतर्गत या योजनेमधून दयावयाचे अर्थसहाय्य हे सलग क्षेत्र असणाऱ्या गटासाठी देय राहील. ज्या ठिकाणी काही कारणामुळे क्षेत्र सलग येत नसेल त्या ठिकाणी क्षेत्र सलग न येण्याच्या कारणासह क्षेत्र आराखडा हा जिल्हा स्तरीय समितीच्या मान्यतेसाठी सादर करावा. जिल्हा स्तरीय समितीने प्रस्तावाच्या मान्यतेबाबत गुणवत्ते नुसार निर्णय घ्यावा. मात्र अशा प्रकरणी गटाचे ५० % पेक्षा जास्त सभासदांना सिंचन सुविधेचा लाभ होईल व सर्व सभासदांची सहमती आवश्यक राहील. प्रचलित योजनेमधून वैयक्तिक स्तरावर सुक्ष्म सिंचन सुविधेसाठी अर्थसहाय्य घेण्याची सुविधा सभासद शेतकऱ्यांना उपलब्ध राहील.

४.२ सामुहिक अवजारे/यंत्र सामग्री बँक निर्मिती - समुहातील प्रचलित व प्रस्तावित पिक पध्दतीनुसार आवश्यक ती अवजारे / यंत्रसामग्री खरेदी करणे व त्यासाठी शेड बांधकाम करणे.

४.३ सामुदायिक पशूधन व्यवस्थापन - प्रत्येक सदस्याकडील उपलब्ध पशूधन, त्यात अजून वाढ करावयाचे पशूधन याचा विचार करून पशूधनासाठी सामूहिक गोठा बांधकाम करणे, स्लरी यूनिट करणे, गांढूळ शेड, कंपोस्ट निर्मितीसाठी युनिट, मुरघास (सायलेज) युनिट व संयंत्र, अंडी देणाऱ्या कोंबडयांसाठी जाळया तसेच दुध संकलन व प्रक्रियेसाठी आवश्यक संयंत्र

४.४ सामुहिक तत्वावर नियंत्रित शेती करणे - सामुहिक तत्वावर पॉलि हाउस, शेडनेट हाउस उभारणी करण्यासाठी गट शेती अंतर्गत अर्थसहाय्य देय राहील.

४.५ सामुदायिक संकलन, साठवणूक व प्रक्रिया केंद्राची निर्मीती - समुहामध्ये असणाऱ्या पिक पध्दतीनुसार आवश्यक असणाऱ्या प्रक्रियेच्या सर्व मशिनरी व संयंत्र, संकलन, साठवणूक इ. कामे

४.६ विपणन व्यवस्था - समुह शेतीमधील उत्पादित मालाचे, पॅकींग करणे, ब्रॅडींग करणे व मालाचे विपणनासाठी रेफर व्हॅन खरेदी इ.

४.७ गटाने ४.५ व ४.६ मधील समाविष्ठ घटकावर प्रकल्प रक्कमेच्या **किमान २०%** खर्च करण्यात यावा.

५. **गट पात्रता व निकष -**

५.१ गटामध्ये किमान खातेदार शेतकरी (कुटुंब) संख्या २० व किमान समुहाचे क्षेत्र १०० एकर राहील.

५.२ कोंकण विभागाकरीता क्षेत्र मर्यादा १०० एकर ऐवजी ५० एकर व या क्षेत्राच्या प्रमाणात आर्थिक अनुदान अनुज्ञेय राहील.

५.३ गट शेतीचा उद्देश उत्पादन ते विपणन (End to End Use) या तत्वानुसार कृषि मालाचे मूल्यवर्धन करणे हा आहे, या करिता आवश्यक असणा-या सर्व बाबींचा समावेश प्रकल्पात करणे आवश्यक आहे. त्यामुळे निवड केलेल्या प्रमुख पिकनिहाय/पूरक व्यवसायनिहाय (Key Activity) नमुना प्रकल्प अहवाल आयुक्त (कृषि) यांनी तयार करून शेतकरी गटांना उपलब्ध करून द्यावा. समान उद्दीष्टांवर एकत्र आलेल्या गटाने आवश्यकतेनुसार शेतीची सिंचन सूविधा व अवजारे बँक या व्यतिरिक्त पिक निहाय किंवा पूरक व्यवसाय निहाय जास्तीतजास्त एक किंवा दोन पिक/पूरक व्यवसाय निवडावेत. अपवादात्मक परिस्थितीत दोनपेक्षा जास्त व्यवसायाचा सामावेश करावयाचा झाल्यास जिल्हास्तरीय समितीने गुणवत्तेवर निर्णय घ्यावा.

५.४ सामुदायिक घटकांच्या (उदा. सामूहिक शेततळे, प्रक्रिया केंद्र, सामुहिक विहीर, साठवणूक केंद्र इ.) उभारणीसाठी लागणारे क्षेत्र हे गटाचे मालकीचे असावे किंवा किमान २५ वर्षे भाडेपटटयाच्या नोंदणीकृत करारावर गटाचे नावावर असावे.

५.५ सामुदायिक स्वरूपात उभारणी केलेल्या सुविधाच्या आर्थिक सहभागाबाबत, वापराबाबत व त्यापासून होणारे फायदे याबाबत गटांचे सर्व सभासदांमध्ये आपसी सामंजस्य करार (MOU)नोंदणीकृत असावा.

६. **गटांची निवड, मान्यता व गटाच्या प्रकल्प आराखडयास मंजूरी -**

६.१ आर्थिक तरतुदीनुसार जिल्हानिहाय गटांचे लक्षांक आयुक्त (कृषि) निश्चित करुन देतील मात्र जिल्ह्यास किमान ४ गटांचे उद्दिष्ठ देणे आवश्यक राहील.

६.२ गटांचे निवडीचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहील.

६.३ गटाने योजनेसाठी आयुक्त (कृषि) यांनी निश्चीत करून दिलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करावा. गटास तत्वत: मान्यता प्राप्त करून घेण्यासाठी प्रस्तावासोबत खालील बाबी अंतर्भूत कराव्यात.

अ) गटाची नोंदणी प्रमाणपत्र

ब) सभासद कार्यक्षेत्र नकाशा

क) सभासद यादी व त्यांचे सामाविष्ठ क्षेत्र

ड) बँक खाते तपशिल

इ) गटामार्फत हाती घ्यावयाच्या उपक्रमाचा प्राथमिक आराखडा

६.४ जिल्हास्तरीय समितीने प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करून निकषानुसार पात्र गटांची यादी निश्चित करावी. ज्या शेतकरी गटाने गट शेती योजनेसाठी तयार केलेल्या सविस्तर आराखडयास (DPR)लागणारा निधी बँकिंग प्रणाली (Banking Mechanism)च्या माध्यमातून मिळणार असल्याबाबतचे करार/संमतीपत्र असेल अथवा घाऊक (Wholesale)विपणन कंपन्यासोबत उत्पादन व विक्री व्यवस्थेच्या मुल्यसाखळी (Forward/ Backward Linkage)बाबतचा करार केला असेल अशा शेतकरी उत्पादन गटास गटशेती योजनेअंतर्गत प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

६.५ गट निवडीचे पत्र जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेनुसार जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी निर्गमित करतील व त्यानंतर एक महिन्याचे कालावधीत सदर गटाने सविस्तर प्रकल्प आराखडा (DPR) जिल्हा अधीक्षक कृषि अधिकाऱ्यांना सादर करावा. मुदतीत आराखडा प्राप्त न झाल्यास प्रतीक्षा यादीतील गटांना निवडपत्र द्यावे.

६.६ गटांचा सविस्तर प्रकल्प आराखडा (DPR) प्राप्त झाल्यानंतर जिल्हास्तरीय समितीने त्याबाबत १५ दिवसात निर्णय घ्यावा. आवश्यकता असल्यास आराखडयामध्ये योग्य त्या सुधारणा सूचवाव्यात. जिल्हास्तरीय समितीने सुचविलेल्या सुधारणा शेतकरी गटास बंधनकारक राहतील. जे गट जिल्हास्तरीय समितीने सुचविलेल्या सुधारणा मान्य करणार नाही ते गट रद्द ठरविण्यात येतील. जिल्हास्तरीय समितीने अंतिम मंजूरी प्रदान केलेला प्रकल्प आराखडा गटाने निवड केलेल्या बँकेकडे जिल्हा स्तरीय समितीच्या शिफारशीसह (Sponsored Proposal) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सादर करावा. तसेच या प्रकल्पाच्या कर्ज मंजुरीबाबत बँकर्स समितीमध्ये मंजुरीसाठी पाठपुरावा करावा.

६.७ गटाकडून प्रकल्प आराखडा प्राप्त न होणे, प्रकल्पाची अंमलबजावणी योग्यपणे न होणे, गटामध्ये वाद निर्माण होणे अशा पार्श्वभूमीवर गटाची मंजुरी रद्द करण्याचे अधिकार जिल्हा स्तरीय समितीकडे राहतील.

७. सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करणे -

७.१ गटास तत्वत: मान्यतेचे पत्र प्राप्त झाल्यानंतर गटाने एक महिन्यांच्या कालावधीत सविस्तर प्रकल्प आराखडा जिल्हास्तरीय समितीकडे सादर करण्यासाठी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

७.२ गटाचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्यासाठी तांत्रिक सल्लागार / तांत्रिक सेवा पुरविणाऱ्या संस्थेची मदत घेता येईल.

७.३ तांत्रिक मार्गदर्शनासाठी शुल्क म्हणून गटास गटशेती अंतर्गत रुपये १.०० लाख रूपये प्रति वर्ष मर्यादेत २ वर्षाकरिता अर्थसहाय्य देय राहील. अनूदान हे तांत्रिक सल्लागार/ सेवादाता/तज्ञ यांना सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करणे, गटांच्या लेख्यांचे व्यवस्थापन करणे, गटांना मार्गदर्शन करणे इत्यादी बाबींसाठी हे अनुदान देय राहील.

७.४ परिच्छेद क्र ६.४ नूसार निवड केलेल्या गटांना कृषी व संलग्न विभागाच्या योजनांची माहीती देणे त्याचबरोबर सविस्तर आराखडा करण्यास तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील.

७.५ सविस्तर प्रकल्प आराखडयास अंतिम मंजूरी प्रदान करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहतील तथापि आराखडा अंतिम मंजुरी दिल्याचे पत्र व आराखड्याची प्रत जिल्हा स्तरीय समितीने आयुक्त कृषि यांना सादर करावी. कृषि आयुक्तालयाने आराखड्याबाबत अभिप्राय असल्यास जिल्हा स्तरीय समितीला कळवावे. त्याप्रमाणे आराखड्यात सुधारणा करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

७.६ ज्या बाबींसाठी कृषि व संलग्न विभागाच्या प्रचलित योजनेतंर्गत मापदंड मंजुर नाहीत अशा बाबीकरीता नोंदणीकृत मुल्यांकन करणा-या (Registered Valuer) किंवा त्याबाबींशी संबंधित शासकीय मुल्यांकण करून घ्यावे व त्याआधारे अनुदान निर्धारण करावे.

७.७ प्रकल्प आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सुचना आयुक्त (कृषि) यांनी निर्गमीत कराव्यात व त्यासाठी पीक निहाय/पुरक व्यवसाय निहाय उत्पादन ते विपणन (End to end use) यासाठी लागणा-या आवश्यक बाबींचे प्रारुप अहवाल (Model Report) तयार करण्यात यावे. याबाबतचे जिल्हास्तरीय नोडल अधिका-यांचे प्रशिक्षण घेण्यात यावे. प्रकल्प आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक सविस्तर मार्गदर्शक सूचना आयुक्त (कृषी) यांनी निर्गमित कराव्यात.

७.८ गट शेती योजने अंतर्गत निवड झालेल्या गटांना तांत्रिक मार्गदर्शन करणेसाठी कृषि विद्यापीठांनी प्रत्येक गटाकरीता एका तज्ञ/प्राध्यापक/शास्त्रज्ञांची निवड करावी. त्या तज्ञाच्या/प्राध्यापकाच्या /शास्त्रज्ञाच्या कामाचा अनुभव विचारात घेऊन प्रत्येक गटाला मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी तो जिल्हा ज्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात आहे त्या विद्यापीठाच्या तज्ञ /प्राध्यापक/शास्त्रज्ञ यांच्या यादीमधून एका तज्ञाची/प्राध्यापकाची/शास्त्रज्ञाची निवड करावी. या गटाला मार्गदर्शन करणे ही त्या तज्ञाची/प्राध्यापकाची/शास्त्रज्ञाची जबाबदारी राहील. यासाठी आवश्यक प्रवास भत्त्याची तरतूद संबंधित कृषि विद्यापीठाने करावी.

८. प्रकल्प कार्यान्वयन व अनुदान वितरण -

८.१ परिच्छेद क्र. ६.६ नूसार सविस्तर प्रकल्प आराखडा मंजूरी प्राप्त झाल्यानंतर गटास गट शेती योजनेतून देय अनुदानाच्या १५ टक्के पर्यंत अग्रीम अनुदान जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी गटाच्या मागणी प्रमाणे गटांचे बँक खात्यावर वर्ग करावे. या अनुदानातून गटाने आराखड्यामध्ये मंजूर बाबीवर ज्या सामुहिक बाबींसाठी कर्ज घेऊ इच्छित नाहीत अशा बाबींवर खर्च करावा. या अनुदानाचा विनियोग गटाने केल्यानंतर त्याबाबतचे मूल्यमापन कृषि विभागाचे अधिकारी

अथवा इतर सक्षम अधिकारी किंवा अधिकृत मुल्यांकन करणा-यांकडून करून घ्यावे व देय अनुदानाचे समायोजन करावे.

८.२ गटांना ज्या बाबीसाठी अर्थ सहाय्य घ्यावयाचे आहे त्या बाबींसाठी वित्तीय संस्थेने अर्थसहाय्य मंजूर केल्यानंतर व संबंधित गटाने गटाचा आवश्यक सहभाग बँकेत जमा केल्या नंतर बँकेची मागणी घेऊन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी कर्ज मंजूर झालेल्या बाबीस देय असलेले अनुदान बँकेकडे वर्ग करावे. बँकेने हे अनुदान त्यांचे Subsidy Reserve Fund खात्यामध्ये गटाचे नावे जमा करून गटास कामाच्या प्रगती प्रमाणे उपलब्ध करून दयावे.

९. **जिल्हास्तरीय समितीची रचना :**

१) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आत्मा नियामक मंडळ अध्यक्ष
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद- सदस्य
३) प्रकल्प संचालक, आत्मा -सदस्य
४) कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद- सदस्य
५) उप निबंधक, सहकार- सदस्य
६) लीड बँक अधिकारी/ नाबार्ड प्रतिनिधी - सदस्य
७) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी / (उपसंचालक पशुसंवर्धन)
८) रेशीम विभाग अधिकारी
९) जिल्हा मत्स्यव्यवसाय अधिकारी
१०) संबंधित कृषि विद्यापीठ नियुक्त शास्त्रज्ञ
११) जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी
१२) जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी
१३) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी- सदस्य सचिव

१०. शेतकऱ्यांचे समुह व गट शेतीस चालना देणे या योजनेवर कृषि आयुक्तांचे संनियंत्रण व देखरेख राहील. गट शेती या योजनेची प्रभावी अंमजबजावणी करीता आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना आयुक्त (कृषि) यांनी निर्गमित कराव्यात.

११. गट शेती योजनेमध्ये शेतक-यांचे चांगले संघटन होऊन कृषि विकास घडून यावा यासाठी गटांना प्रोत्साहन म्हणून चांगले काम करणा-या गटांना बक्षीस देऊन पुरस्कृत करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. यासाठी विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्यांचे विभागातून प्रत्येक जिल्ह्यातून उत्कृष्ट कामगिरी केलेल्या एका गटाचा प्रस्ताव प्राप्त करुन घ्यावा. प्राप्त प्रस्तावातून विभागातील एका गटाचा प्रस्ताव संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांना सादर करावा. संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी आयुक्त (कृषि) यांचेमार्फत सदर प्रस्ताव शासन स्तरावरील समितीकडे सादर करावेत. शासन स्तरावरील निवड समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

१) प्रधान सचिव/सचिव (कृषि), अध्यक्ष
२) प्रधान सचिव/सचिव (पदुम), सदस्य
३) आयुक्त (कृषि), सदस्य
४) आयुक्त (सहकार), सदस्य
५) आयुक्त (पशुसंवर्धन), सदस्य
६) कृषि पुरस्कार प्राप्त एक शेतकरी
७) कृषि विद्यापीठ/भारतीय कृषि अनुसंधान संशोधन संस्थेचा प्रतिनिधी
८) संचालक (विस्तार व प्रशिक्षण) सदस्य सचिव

विभागीय कृषि सहसंचालक यांचे कडून प्राप्त प्रस्ताव प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या शेतकरी गटांची निवड शासन मान्यतेने करण्यात येईल. सदर पुरस्काराची रक्कम प्रथम पुरस्कार रु. २५ लाख, द्वितीय पुरस्कार रु. १० व तृतीय पुरस्कार रु.५ लाख निश्चित करण्यात येत आहे. पुरस्काराची रक्कम त्या गटांनी विहीत निकषाप्रमाणे सामुदायिक स्वरुपाच्या कामासाठीच वापरावी. पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्यासाठी स्वतंत्र मार्गदर्शक सुचना संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी निर्गमित कराव्यात.

१२. **प्रशासकीय खर्च**

या योजनेच्या एकूण निधीपैकी दोन टक्के निधी हा प्रशासकीय बाबींकरीता खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. यामधून बाहयस्त्रोताद्वारे आवश्यक मनुष्यबळाची सेवा, कार्यालयीन खर्च, प्रवास खर्च, प्रशिक्षण, कार्यशाळा इ. बाबी देय राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१००५१४५७०११००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2018.10.05 15:01:53 +05'30'

(अशोक आत्राम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त(कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत-

१) मा.मुख्यमंत्री , महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
२) मा.मंत्री (वित्त) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री (कृषि) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा.राज्यमंत्री (कृषि) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
५) सर्व विधानमंडळ सदस्य.

६) अपर मुख्य सचिव, (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७) सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव, पणन, वस्त्रोद्योग, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सचिव, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव (जलसंपदा) मंत्रालय, मुंबई.
११) सचिव (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई.
१२) सचिव (महिला बालकल्याण), मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव, जलसंधारण, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, वस्त्रोद्योग, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी,
१६) कुलगुरु, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
१७) कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर,
१८) कुलगुरु, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी,
१९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
२०) महालेखापाल १/२ (लेखा परिक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर
२१) सर्व विभागीय आयुक्त
२२) सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आत्मा नियामक मंडळ
२३) मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषद तथा उपाध्यक्ष आत्मा नियामक मंडळ
२४) निवड नस्ती कार्यासन ३ अे